# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 10/12/2022 (शनिवार) सायंकाळ

---

## विनयभंग

**पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत मौजा कचारी सावंगा येथे दिनांक ०९/१२/२०२२ चे १७.४५ वा. ते १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— सौ. संध्या सतीश कवलकर, वय ३६ वर्ष, रा. कचारी सावंगा व आरोपी नामे— किरण भाऊरावजी भोयर, वय ४४ वर्ष, रा. कंचारी सावंगा हे एकाच गावातील रहिवासी असुन यातील आरोपी हा फिर्यादीला बऱ्याच दिवसा पासुन वाईट नजरेने पाहुन जवळीक साधण्याचा प्रयत्न करित होता. नमुद घटना वेळी फिर्यादी ही आठवडी बाजारात बाजार करीत असता आरोपी हा तिचा छुपा पाठलाग करित होता त्यामुळे फिर्यादी ही बाजारातुन घरी जात असता यातील आरोपी याने जाणुन बुजुन फिर्यादी हिला ''तु मला खुप आवडते '' असे बोलुन छेडखानी करून फिर्यादीचा विनयभंग केला तेथे हजर जखमी नामे— रूपेश भोयरकर यांनी त्याला हटकले असता आरोपी यांनी त्यांना त्यांचे घरा जवळ जावुन लाठी काठीने मारहाण केली व दाताने चावा घेतला व शिवीगाळ करून पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४(ड), ३२४, ५०४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील महिला पोलीस उपनिरीक्षक मीना बारंगे मो. नं. ८७८८७५८७४२ पोलीस स्टेशन कोंढाळी या करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील भंडारा ते नागपुर रोड क्र. ५३, गुरूकुल इंटरनॅशनल स्कुलचे समोर वडोदा येथे दिनांक ०८/१२/२०२२ चे १९.१५ वा. सुमारास यातील फिर्यादी नामे— प्रविण भानुदास मानवटे वय ४१ वर्ष, रा. नागपुर याने पोलीस स्टेशनला येऊन रिपोर्ट दिली की, तो भंडारा ते नागपुर रोड एम. एच. ५३ गुरुकुल इंटरनॅशनल स्कुल चे समोर फिर्यादी व त्याचा मित्र एक्टीवा क्र. एम. एच.— ३१/डी. टी.—७८४९ ने जात असता मागुन येणारी आरोपीची पांढऱ्या रंगाची बोलेरो पिकअप गाडीचा चालक याने आपले वाहन भरधाव वेगाने व निषकाळजीपणे चालवुन फिर्यादीचे गाडीला जोरदार धडक दिल्याने फिर्यादीचे मागे बसलेला मित्र मृतक नामे— अनंत चौरसीया, वय २८ वर्ष, रा. नागपुर हा मरण पावला व फिर्यादीचे उजव्या हाताला, खांद्याला व डोक्याला किरकोळ मार लागला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ (अ) भादवी. सहकलम १८४, १३४, १७७ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सतिश सोनेकर, मो. नं. ८२०८३३५१९४ करीत आहे.

# घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत महालगाव कामठी येथे दि. ०९/१२/२०२२ चे ०६.१५ वा. ते दिनांक १०/१२/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— अनिल खुबळे, वय ६४ वर्ष, रा. शिवनगर संगम टॉकीज नागपुर याच्या शेतावर असलेल्या घरातुन कोणीतरी अज्ञात चोराने घराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून ०६ गव्हाचे पोते किंमती अंदाजे १०,०००/—रू. मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक भुरे, ब. नं. १८२६ मो.क्र. ९५८८६७९८१४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**